महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ०४ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २१९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

## प्रशासकीय राजवटीचा अंत

आज महापौरांच्या निवडणुका पार पडताच महानगरपालिकेवरील दीर्घकाळ चाललेली प्रशासकीय राजवट अखेर संपुष्टात आली. ही केवळ एका पदाची निवड नसून, लोकशाही व्यवस्थेच्या पुनर्स्थापनेचा हा महत्त्वाचा क्षण आहे. प्रशासकीय कारभारात निर्णयप्रक्रिया मर्यादित राहते, जनतेचा थेट आवाज कमी होतो. अशा परिस्थितीत लोकनियुक्त प्रतिनिधींचे सत्तास्थानावर येणे म्हणजे नागरिकांच्या अपेक्षांना नवी दिशा देण्याची संधी ठरते.

महापौर हे शहराचे केवळ औपचारिक प्रमुख नसतात, तर ते नागरिकांच्या समस्या, आकांक्षा आणि शहराच्या भविष्याचे प्रतीक असतात. पाणी, स्वच्छता, वाहतूक, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर प्रभावी निर्णय घेण्याची जबाबदारी आता नव्या नेतृत्वावर आहे. प्रशासकीय राजवटीत रखडलेली विकासकामे, प्रलंबित धोरणात्मक निर्णय आणि नागरिकांच्या तक्रारी यांना आता गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नवनिर्वाचित महापौरांना हे लक्षात ठेवावे लागेल की, सत्ता ही अधिकारासाठी नसून सेवेसाठी असते. राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्व पक्षांना सोबत घेऊन शहरहिताचे निर्णय घेणे, पारदर्शक कारभार ठेवणे आणि प्रशासनावर योग्य नियंत्रण ठेवणे, ही काळाची गरज आहे. शहराचा सर्वांगीण विकास, तसेच सामान्य नागरिकांचा विश्वास जपणे, हेच त्यांच्या यशाचे मोजमाप ठरेल.

आजच्या या निवडणुकीने लोकशाहीवरचा विश्वास अधिक दृढ केला आहे. प्रशासकीय राजवटीच्या काळातून बाहेर पडत, शहरे पुन्हा लोकप्रतिनिधींच्या हाती आले आहे. नवनिर्वाचित सर्व महापौरांना मनःपूर्वक शुभेच्छा देत, शहराच्या प्रगतीसाठी त्यांचा कार्यकाळ सकारात्मक, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख ठरो, हीच अपेक्षा !!

# कल्याण डोंबिवलीच्या महापौरपदी अ‍ॅड. हर्षाली चौधरी थविल

## उपमहापौरपदी राहुल दामले यांची बिनविरोध निवड



कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक ०३/०२/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका भवनाच्या चौथ्या मजल्यावरील शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) येथील 'स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर सभागृहात' पार पडली. कोकण विभागीय आयुक्तांनी या सभेसाठी नियुक्त केलेल्या पीठासीन अधिकारी तथा मुंबई शहराच्या जिल्हाधिकारी श्रीमती आंचल गोयल यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली. या विशेष सभेत कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी निवड प्रक्रिया पार पडली असून दोन्ही पदांवर निवड जाहीर करण्यात आली.

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

● प्रतिनिधी / दि. ३

**कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी अ‍ॅड. हर्षाली चौधरी थविल आणि उपमहापौर पदासाठी राहुल दामले यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली होती. आजच्या विशेष महासभेत मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होत्या आणि त्यांनी औपचारिक घोषणा केली. या कार्यक्रमात केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल आणि सचिव किशोर शेळके व्यासपीठावर उपस्थित होते. कोरोना काळात नोव्हेंबर २०२० मध्ये नगरसेवकांचा कार्यकाल संपल्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेवर प्रशासकीय राजवट सुरू झाली होती. कोरोना महामारी आणि इतर कारणांमुळे महापालिका निवडणुका लांबणीवर गेल्या होत्या. गेल्या महिन्यात महापालिका निवडणुका झाल्यामुळे अखेर ६ वर्षांनंतर प्रतीक्षा संपली आहे. महापौर आणि उपमहापौर पदाची निवड झाल्यामुळे या कालावधीत असलेली प्रशासकीय राजवट संपुष्टात आली आहे. निवड प्रक्रियेनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.**

**कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आतापर्यंतच्या महापौरांचा कार्यकाळ**

| अनु | महापौर नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | आरती मोकल | १३-१०-१९९५ ते १२-१०-१९९६ |
| २ | रमेश दळवी | १३-१०-१९९६ ते १२-१०-१९९७ |
| ३ | शरयू प्रधान | १३-१०-१९९७ ते १२-१०-१९९८ |
| ४ | अनिता दळवी | १३-१०-१९९८ ते १२-१०-१९९९ |
| ५ | शाहू सावंत | १३-१०-१९९९ ते १२-१०-२००० |
| ६ | मंगल शिंदे | १३-१०-२००० ते १२-४-२००३ |
| ७ | हरिश्चंद्र पाटील | १३-४-२००३ ते १२-१०-२००५ |
| ८ | पुंडलिक म्हात्रे | ११-११-२००५ ते ११-५-२००८ |
| ९ | रमेश जाधव | ११-५-२००८ ते १०-११-२०१० |
| १० | वैजयंती गुजर-घोलप | १२-११-२०१० ते १०-५-२०१३ |
| ११ | कल्याणी पाटील | ११-५-२०१३ ते १०-११-२०१५ |
| १२ | राजेंद्र देवळेकर | ११-११-२०१५ ते १०-५-२०१८ |
| १३ | विनिता राणे | ११-५-२०१८ ते कार्यकाळ समाप्ती |
| १४ | अ‍ॅड. हर्षाली चौधरी | सद्य कार्यरत |

# मुंबई महापौर निवडणूक 11 फेब्रुवारीला

## भाजप-शिंदे गटाची स्वतंत्र नोंदणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी / दि. ३

**मुंबई :** मुंबई महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडीसाठी राजकीय हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिवसेना (शिंदे) पक्षांमध्ये गटनोंदणी स्वतंत्र करायची की संयुक्त, या प्रश्नावर आधी घोडे अडकले होते. अखेर सोमवारी दोन्ही पक्षांनी स्वतंत्र गटनोंदणी करण्याचा निर्णय घेतला.

भाजप आणि शिवसेना (शिंदे) पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेवक सोमवारी मुंबई महापालिका मुख्यालयात दाखल झाले आणि त्यांची बैठक पार पडली. यानंतर दोन्ही पक्षांनी ठराव करून आपले गटनेते जाहीर केले. भाजपच्या गटनेतेपदी गणेश खणकर यांची नियुक्ती झाली असून ते सभागृह नेते राहतील. तर शिवसेना (शिंदे) पक्षाच्या गटनेतेपदी अमेय घोले यांची निवड करण्यात आली. या दोन प्रमुख निवडीनंतर आता महापौर आणि उपमहापौर कोण होणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.



मुंबई महापौर पदासाठी निवडणूक येत्या ११ फेब्रुवारी रोजी होणार असून, उमेदवार अर्ज भरण्यासाठी तीन दिवस आधीची मुदत दिली जाते. यंदा ७ व ८ फेब्रुवारी शनिवार आणि रविवार असल्याने अर्ज भरण्यास प्रारंभ ६ फेब्रुवारीपासून होईल.

महापौर पदाच्या निवडीसाठी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी हे पीठासीन अधिकारी असतील. दरवेळी महापौर निवडीत मावळते महापौर अध्यक्षस्थानी राहतात, परंतु यंदा महापालिकेचा कार्यकाळ संपून चार वर्षे झाल्यामुळे आयुक्त अध्यक्षस्थानी राहणार आहेत. महापौर व उपमहापौरांची निवड नेहमीप्रमाणे आवाजी मतदानाने होणार आहे.

राजकीय तज्ज्ञांचा अंदाज आहे की, भाजप आणि शिवसेना (शिंदे) गटनोंदणी पूर्ण झाल्यामुळे निवडणुकीत प्रत्येकी आपले प्रभावी मतदान होईल. त्यामुळे मुंबई महापालिकेतील नेतृत्व कोणाकडे जाणार याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.




# ठाण्याच्या महापौरपदी शर्मिला पिंपळोलकर

## उपमहापौरपदी कृष्णा पाटील यांची निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (03 ) : ठाणे महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाची निवडणूक आज पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बिनविरोध झालेल्या या निवडणुकीत ठाणे शहराच्या महापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला पिंपळोलकर यांची, तर उपमहापौरपदी भारतीय जनता पक्षाचे कृष्णा दादू पाटील यांची निवड झाल्याची अधिकृत घोषणा पीठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी केली.**

**आज (03 फेब्रुवारी) ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेस पीठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, जिल्हाधिकारी, ठाणे तसेच महापालिका सचिव मनीष जोशी उपस्थित होते. महापौर व उपमहापौरपदाच्या निवडीची घोषणा झाल्यानंतर ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी नवनिर्वाचित महापौर शर्मिला पिंपळोलकर व उपमहापौर कृष्णा पाटील यांचे तुळशीचे रोप देऊन अभिनंदन व स्वागत केले.**

## थोडक्यात महत्वाचे

### भिवंडीत भटक्या कुत्र्यांची दहशत

#### श्वानदंशाने 12 वर्षीय मुलाचा मृत्यू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी / दि. ३

**भिवंडी :** भिवंडी शहरात भटक्या कुत्र्यांची दहशत दिवसेंदिवस वाढत असून, मागील एका वर्षात तब्बल ११,०३७ नागरिकांना श्वानदंश झाल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर श्वानदंश झालेल्या एका १२ वर्षीय मुलाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली असून, शहरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. ईदगाह परिसरात राहणारा हामिद सद्दाम खान (वय १२) हा १० जानेवारी रोजी घराबाहेर खेळत असताना भटक्या कुत्र्याने त्याच्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात कुत्र्याने हामिदच्या चेहऱ्यावर आणि मानेजवळ चावा घेतला होता. त्याच्यावर तत्काळ स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयात प्रथमोपचार करण्यात आले. मात्र, काही दिवसांनी पुन्हा त्रास वाढल्याने २७ जानेवारी रोजी त्याला पुढील उपचारासाठी कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान, उपचार सुरू असतानाच ३१ जानेवारी रोजी हामिदची प्राणज्योत मावळली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, भिवंडी शहरातील भटक्या कुत्र्यांवर तातडीने नियंत्रण ठेवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### बारा वर्षांत एकही नवी लोकल नाही

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** कल्याणपलीकडील उपनगरी सेवेत गेल्या बारा वर्षांत एकही नवीन साधी लोकल सुरू झालेली नसल्याने बदलापूर, अंबरनाथ, वांगणी या पट्ट्यातील प्रवाशांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. वाढती गर्दी, मर्यादित गाड्या आणि अपुऱ्या सुविधांमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही गंभीर बनत चालला आहे. गेल्या दोन दशकांत या भागातील नागरीकरण वेगाने वाढले आहे. हजारो नागरिक रोज बदलापूर-कल्याण-ठाणे-मुंबई असा लोकलने प्रवास करतात. मात्र गाड्यांची संख्या वाढलेली नसल्याने प्रत्येक लोकल अक्षरशः खचाखच भरलेली असते. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत तर प्लॅटफॉर्मवर आणि डब्यांच्या दरवाज्यांवर जीव धोक्यात घालून प्रवास करणाऱ्यांचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे.

# मुंबई–पुणे प्रवास फक्त 48 मिनिटांत

## महाराष्ट्रासाठी व्यापक रेल्वे विकास आराखडा जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी / दि. ३

**मुंबई : केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी महाराष्ट्रासाठी व्यापक रेल्वे विकास आराखडा जाहीर केला असून, यासाठी तब्बल २३,९२६ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय रुपरेषा घोषित करण्यात आली आहे. या आराखड्यात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर, मालवाहतूक कनेक्टिव्हिटी आणि राज्यभरातील रेल्वे पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण यांचा समावेश आहे.**



रेल्वे मंत्री वैष्णव यांनी सांगितले की, सध्या महाराष्ट्रात आधीच १.७० लाख कोटी रुपयांचे रेल्वे प्रकल्प सुरू आहेत. त्यात आता मुंबई–पुणे तसेच पुणे–हैदराबाद दरम्यान नवीन हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर, फ्रेट कॉरिडॉर आणि इतर महत्त्वाच्या प्रकल्पांची भर पडणार आहे. या योजनांमुळे राज्यातील दळणवळण व्यवस्था अधिक गतिमान होणार आहे.

हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरमुळे मुंबई ते पुणे दरम्यानचा प्रवास वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, हा प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत पूर्ण होणार आहे. त्यामुळे ही दोन्ही शहरे व्यावहारिकदृष्ट्या आणखी जवळ येतील आणि दररोज कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबई–पुणे हायस्पीड रेल्वे मार्गाबाबत पुण्याचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा यांनी माहिती दिली. हा नवीन हायस्पीड कॉरिडॉर मुंबईहून लोणावळा, पुणे, दौंड मार्गे पुढे हैदराबादशी जोडला जाणार आहे. पुणे आणि हैदराबाद ही दोन्ही शहरे आयटी, इलेक्ट्रॉनिक्स आणि उत्पादन क्षेत्रातील प्रमुख केंद्रे असल्याने या कॉरिडॉरचा मोठा फायदा होणार आहे. या हायस्पीड कॉरिडॉरमुळे पुणे आणि हैदराबाद दरम्यानचा प्रवास वेळ केवळ १ तास ५५ मिनिटांवर येणार आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या जलद समन्वयामुळे हे प्रकल्प मार्गी लागत असल्याचेही रेल्वे मंत्री वैष्णव यांनी स्पष्ट केले. प्रकल्पाच्या प्रारंभी एक ते दोन तासांच्या अंतराने बुलेट ट्रेन धावतील, अशी माहिती देत रेल्वे मंत्री म्हणाले की, प्रकल्प स्थिर झाल्यानंतर ट्रेनच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात येईल. टोक्यो ते ओसाका दरम्यान १५ ते २० मिनिटांनी बुलेट ट्रेन धावतात, त्याच धर्तीवर भारतातही अशी व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.



# उल्हासनगर महापालिकेवर कलानींचे वर्चस्व

## अश्विनी निकम महापौर, अमर लुंड उपमहापौर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ■ प्रतिनिधी / दि. ३

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी कलानी गटाच्या अश्विनी निकम व भाजपच्या अमर लुंड यांची बिनविरोध निवड झाली. निवडणुकीपूर्वी कलानी समर्थकांनी शिवसेनेसोबत 'दोस्ती का गठबंधन' जाहीर केले होते. या युतीमुळे शहरात कट्टर विरोधक असूनही आता दोन्ही पक्ष एकत्र पालिकेचा कारभार सांभाळणार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी रत्नागिरीचे जिल्हाधिकारी मनुज जिंदल होते.

सविस्तर वृत्त पान 03 वर

# सुनेत्रा पवारांकडे बीड व पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. ३**

**मुंबई :** राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांच्याकडे आणखी दोन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. सुनेत्रा पवार आता बीड आणि पुणे या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्री म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत. यापूर्वी ही जबाबदारी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे होती. त्यांच्या अकाली निधनानंतर ही जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आली आहे.

दि. २८ जानेवारी रोजी अजित पवार यांचे अपघाती निधन झाले. मुंबईहून बारामतीकडे जात असताना त्यांच्या विमानाचा अपघात झाला होता. या भीषण अपघातात अजित पवार यांच्यासह विमानातील पाचही प्रवाशांचा मृत्यू झाला. यामध्ये त्यांचे सुरक्षा रक्षक, दोन पायलट आणि एका फ्लाइट अटेंडंटचा समावेश होता. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली होती. अजित पवार हे केवळ उपमुख्यमंत्रीच नव्हते, तर राज्य शासनाने त्यांच्यावर अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या. त्यांच्या अकाली निधनामुळे ही खाती रिक्त झाली होती. त्यामुळे उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आली. राज्याच्या ११ व्या उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास ही तीन खाती देण्यात आली आहेत. तर नियोजन व वित्त हे महत्त्वाचे खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवले आहे.

दरम्यान, पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी यापूर्वी अजित पवार यांच्याकडे होती. २०२५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर बीड जिल्ह्याची जबाबदारी पहिल्यांदाच त्यांच्याकडे आली होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्हा विशेष चर्चेत राहिला होता. अजित पवार यांनी या जिल्ह्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सकारात्मक बदलांना सुरुवात झाली होती. मात्र, बीडचा कायापालट सुरू असतानाच त्यांचे अकाली निधन झाले. आता पुण्याचा नियोजित विस्तार आणि बीड जिल्ह्यातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे मोठे आव्हान सुनेत्रा पवार यांच्यासमोर असणार आहे.



# कल्याण डोंबिवली मनपात सीएसआर निधीतून तिसरा सोलर हायमास्ट





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात शाश्वत विकास (Sustainable Devolpment) वर भर देवून शहराचा विकास करण्याचा महापालिका आयुक्त श्री. अभिनव गोयल, यांचा मानस आहे. तसेच महापालिका क्षेत्रात लोकोपयोगी उपक्रम हे कॉरपोरेट सामाजिक जबाबदारी निधी मधून कामे हाती घेणेत यावी व त्यासाठी महापालिका अधिकारी यांनी पाठपुरावा करावा, असे महापालिका आयुक्त यांचे धोरण आहे.

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात सहजानंद चौक कल्याण (प) येथे तिसरा सोलार हायमास्ट हा मे. बजाज इलेक्ट्रिकल या कंपनीने कॉरपोरेट सामाजिक बांधिलकी निधीतून उपलब्ध करुन दिला असून सोलार हायमास्ट फिटींग्सचे लोकार्पण दि.०२/०२/२०२६ रोजी महापालिका आयुक्त श्री. अभिनव गोयल, यांचे शुभहस्ते संपन्न झाले. उदघाटन समयी श्री. प्रशांत रा. भागवत, अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत/यांत्रिकी), श्री. जितेंद्र व्ही. शिंदे, कार्यकारी अभियंता (विद्युत) व श्री. भागवत पाटील, उप अभियंता (विद्युत) व मे. बजाज इलेक्ट्रिकल कंपनीचे रिजनल हेड श्री. सरोज कुमार व ओरीया हेड श्री. तरण कोहली उपस्थित होते.

महापालिका क्षेत्रात आतापर्यंत तीन सोलार हायमास्ट कॉरपोरेट सामाजिक जबाबदारी निधी मधून उभारण्यात आलेले आहेत. कल्याण (प) गणपती चौक गांधारे, इंदिरानगर चौक डोंबिवली (पूर्व) व सहजानंद चौक, कल्याण (प) या ठिकाणी सोलार हायमास्ट उभारण्यात आले आहेत.

सोलार हायमास्ट हे सुर्याच्या किरणांवर कार्यान्वित होणार असून त्यास विजेची गरज नाही तसेच महावितरण कंपनीची विज खंडीत झाल्यानंतर सुध्दा हे सोलार हायमास्ट कार्यान्वित राहतील, त्यामुळे चौकात प्रकाश राहणार असल्याने नागरीकांच्या सुरक्षिततेमध्ये वाढ होणार आहे. तसेच महापालिका क्षेत्रातील १४४ हायमास्ट पैकी उर्वरीत १४१ हायमास्ट हे सोलार हायमास्ट करणेकामी नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव पाठविले असल्याबाबतची माहिती महापालिकेचे अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत/यांत्रिकी) श्री. प्रशांत रा. भागवत, यांनी दिली.

# केडीएमसी महापौर व उप महापौर निवडीची प्रक्रिया संपन्न

## नागरीकांनी दर्शविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही - नवनिर्वाचित महापौर हर्षाली विजय चौधरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : नागरीकांनी दर्शविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे प्रतिपादन नवनिर्वाचित महापौर हर्षाली विजय चौधरी यांनी आज केले. महापालिका सभागृहात पीठासीन अधिकारी आंचल गोयल (मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर) यांच्या अध्यक्षतेखाली महापौर व उपमहापौर पदाची निवडणूक प्रक्रिया संपन्न झाली. यावेळी दाखल झालेल्या वैध नामनिर्देशन पत्राच्या अनुषंगाने हर्षाली विजय चौधरी यांस महापौर म्हणून आणि राहुल वसंत दामले यांस उप महापौर म्हणून पीठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

जनतेची कामे व्यवस्थित होणे गरजेचे आहे, यासाठी सर्वांची साथ असावी परंतु नागरीकांनी दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, माझ्या वरील जबाबदारीचे सोनं करेन अशा शब्दात महापौर हर्षाली चौधरी यांनी उपस्थितांना आश्वासित केले.

एकमेकांच्या हातात हात घालून समन्वयाने कल्याण डोंबिवलीला पुढे नेऊया असेही उद्गार नवनिर्वाचित उपमहापौर राहुल दामले यांनी यावेळी बोलतांना काढले.

मा.खासदार डॉ.श्रीकांत शिंदे तसेच सभागृहातील उपस्थित पालिका सदस्यांनी नवनिर्वाचित महापौर व उप महापौरांचे अभिनंदन केले.

यासमयी मा.आमदार सुलभाताई गायकवाड, मा. आमदार राजेश मोरे, मा.माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# जनगणना २०२७ करिता भिवंडी महानगरपालिका तयार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : स्वातंत्र्यानंतरच्या 8 व्या जनगणनेकरिता आज महानगरपालिका मुख्यालयामध्ये प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. याकरिता जनगणना संचालनालयाकडून श्री. प्रविण भगत, सहायक संचालक व अरुण साळगावंकर, वरिष्ठ निरीक्षक, ग्रेड-1 यांची नियुक्ती करण्यात आली. आज दिनांक 03.02.2026 रोजी महानगरपालिकेचे प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त, शहर जनगणना अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन), प्रभाग अधिकारी तथा चार्ज अधिकारी यांना घर यादी गट तयार करणे बाबतचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळेच्या जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे ही जनगणना ही पुर्णतः डिजीटल स्वरुपात होणार आहे. याकरिता जनणना संचालनायाने स्वतंत्र CMS (Census Management System) पोर्टल तयार केले आहे.




या प्रशिक्षणसाठी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. अतिरीक्त आयुक्त, श्री. विठ्ठल डाके, उपायुक्त (प्रशासन) श्री. विक्रम दराडे, सहायक आयुक्त जनगणना श्री. नितीन पाटील, विभाग प्रमुख जनगणना श्री. अजीत महाडिक, महानगरपालिकेतील बांधकाम व नगररचना विभागाचे अभियंते, प्रभाग अधिकारी, कर निरीक्षक हे उपस्थित होते.

# फेसबुकचा वाढदिवस!

विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २२ वर्ष पूर्ण झाली . याचाच अर्थ आज फेसबुकचा बाविसावा वाढदिवस आहे. आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या तीनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्रयूआर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २२ वर्षांपूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. जगातील जवळपास पंधरा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य



सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुकने आता वापरकर्त्यांसाठी ए आय ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे वापरकर्ते ए आय च्या मदतीने आपल्याला हवी ती माहिती क्षणार्धात मिळवू शकतात. तसेच ए आय चा वापर करून आपले फोटो, व्हिडिओ, रिल्स, व्हिडिओ शेअर करू शकतात. फेसबुकवर दररोज अब्जावधी फोटो, व्हिडिओ आणि रिल्स शेअर केले जातात. तसेच फेसबुकवर दररोज अब्जावधी पोस्टचा पाऊस पडतो. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. आज इंस्टाग्रामवर अधिक वेळ घालवत असली तरी फेसबुक ही त्यांना तितकेच प्रिय आहे. फेसबुकवर सर्वच वयोगटातील लोकांचे अकाऊंट आहे. प्रत्येकाला फेसबुक जवळचा वाटतो. फेसबुक नंतर अनेक सोशल नेटवर्किंग साईट आल्या पण फेसबुकने आपला दर्जा कायम ठेवला त्यामुळेच २२ वर्ष होऊनही फेसबुकची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. सर्वांच्या लाडक्या फेसबुकला २२ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# अर्थसंकल्पातून अर्थबोध : 'अर्थसंवाद २०२६' कार्यक्रमाची यशस्वी सांगता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागात मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता 'अर्थसंवाद २०२६' हा मार्गदर्शनात्मक अर्थसंकल्प विषयावरील कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे यांच्या प्रेरणेने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य




डॉ. कैलास कलकटे उपस्थित होते.

या कार्यक्रमात अर्थशास्त्र विभागाचे प्रा. शरद खाकर यांनी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मधील तरतुदी, त्याचा शिक्षण, युवक, महिला, कृषी व विविध आर्थिक क्षेत्रांवर होणारा परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये अर्थसंकल्पा विषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाचे संयोजन प्रा. रसिका सकपाळ यांनी केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून कार्यक्रम अधिक संवादात्मक झाला. शेवटी आभारप्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# उड्डान फेस्टिवल हे तरुणाईच्या कला-कौशल्यांचा उत्सव-डॉ. बळीराम गायकवाड






दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण( नरेंद्र पाटील) :** मुंबई विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग (डीएलएलई) व साकेत ज्ञानपीठ कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने साकेत ज्ञानपीठ कल्याण येथील भव्य प्रांगणात नुकतेच 'उड्डान फेस्टिवल' संपन्न झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मुंबई विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग (डीएलएलई) या विभागाचे डायरेक्टर डॉ. बळीराम गायकवाड, डॉ. कुणाल जाधव, डॉ. अनिल सिंह, साकेत ज्ञानपीठ कल्याण या संस्थेचे संस्थापक डॉ. विनोद तिवारी, प्राचार्य डॉ. संतोष रुकारी, सदस्य डॉ. नारायण फडके, डॉ. हीर बोलकानी इत्यादी विचारवंत आणि ३४ महाविद्यालयांचे सुमारे ७५० विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी पथनाट्य, पोवाडा, सर्जनशील लेखन, वक्तृत्व आणि पोस्टर मेकिंग या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांसाठी तज्ञ परीक्षक म्हणून प्रा.शारदसुत सुनील म्हसकर, प्रा.प्रदिप सरवदे, डॉ. श्रीम. बॅनर्जी, डॉ. शुभम सोनवणे, भीमराव खेत्रे, रोहन टिल्लू, उत्कर्षा साने, विद्यानाथ सुर्वे, रमेश चांदणे, प्रदिप गोगटे, यज्ञेश दौंड, रामदास लांडगे यांनी स्पर्धांचे उत्तम परीक्षण केले. क्षेत्र समन्वयक डॉ.बॅनर्जी, डॉ.नितीन गाढे, डॉ.सुनील नांबियार, डॉ.दिलीप आहुजा यांचे विशेष योगदान लाभले. याप्रसंगी डायरेक्टर डॉ. बळीराम गायकवाड यांनी उपस्थिताना मार्गदर्शन करतांना म्हटले की, "मुंबई विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग (डीएलएलई) या विभागातर्फे 'उड्डान फेस्टिवल' च्या अंतर्गत महाराष्ट्रातील एकूण ३८० महाविद्यालयांमध्ये ज्या विविध स्पर्धा घेत आहोत त्यात सुमारे ९००० विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी होणार आहेत. या स्पर्धांच्या माध्यमातून आपण विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना विकसित करणे, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकास, संघकार्य, सादरीकरण कौशल्ये, लेखन क्षमता, नेतृत्व कौशल्ये यांसारखी रोजगारक्षम कौशल्ये वाढवणे ही महत्वाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने मार्गक्रमण करत आहोत, ही आपल्या सर्वांसाठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. 'उड्डान फेस्टिवल' हे तरुणाईच्या विचारशक्तीचा, सामाजिक जाणिवेचा आणि कला - कौशल्याचा उत्सवच आहे ! आजचे हे व्यासपीठ तुम्हाला भविष्यात एक जबाबदार नागरिक बनवण्याचा पहिला टप्पा आहे. यातून तुमच्यासारख्या युवापिढीला उद्याचा समर्थ व सशक्त भारत घडविण्याची सकारात्मक प्रेरणा व ऊर्जा मिळत राहिल, वैचारिक क्रांती घडवून आणण्याची ताकद मिळू शकेल . यासाठीच आपण आपल्या सर्वांमध्ये विश्वगुरू बनण्याची जी दिव्य क्षमता दडून बसली आहे, ती ओळखून महान कार्य करत राहणे व देश घडवत राहणे ... हीच आजच्या काळाची गरज आहे."

यावेळी संचालक डॉ. बळीराम गायकवाड यांनी प्रा. कुणाल जाधव, डॉ. शुभम सोनवणे, प्रशांत कांबळे, किरण पाटील, मयूर नाईक, आदित्य पवार ही संपूर्ण डीएलएलई विभागाची टीम आणि साकेत ज्ञानपीठ कल्याण यांचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांचे तसेच उड्डाण महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या सर्व महाविद्यालयांचे विद्यार्थी व मार्गदर्शक प्राध्यापक, जाणकार व तज्ञ परीक्षक या सर्वांनी हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे ऋणनिर्देश व्यक्त करून विजेत्या युवा स्पर्धकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांचे विशेष कौतुक केले.

# सुमेधा चिथडे यांचे कल्याण मध्ये व्याख्यान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : "वंदे मातरम" या गीताच्या शतकोत्तर सुवर्ण पूर्ती निमित्त रविवारी ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४:३० वाजता ऐतिहासिक कल्याणाच्या सुभेदार वाड्यात "राष्ट्राय स्वाहा इदम न मम" या विषयावर श्रीमती सुमेधा चिथडे (पुणे) यांच्या दृक- श्राव्य कार्यक्रमाचे आयोजन उज्वला मंडळातर्फे केले आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आपली सैन्यदले कर्तव्य बजावत असतात. अशांसाठी सियाचेन लेह सारख्या दुर्गम भागात ऑक्सिजन निर्मितीचा प्रकल्प सुमेधा चिथडे यांनी उभारला आहे. तरी देश प्रेमी नागरिकांनी या अनुभव कथनाचा लाभ घ्यावा व सैन्याच्या अडचणी दूर करण्यासाठीच्या निधी संकलनात जास्तीत जास्त योगदान द्यावे असे आवाहन उज्वला मंडळाच्या अध्यक्षा सुनीता केळकर यांनी केले आहे. उज्वला मंडळाचे हे ७६ वे वर्ष आहे.

# कल्याणातील कॅप्टन ओक हायस्कूलने राबविला निसर्गचित्रणाचा अनोखा उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याणातील बालक मंदिर संस्थेच्या सुप्रसिद्ध अशा कॅप्टन रवींद्र माधव हायस्कूलमध्ये दि.३फेब्रुवारी २०२६ रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी निसर्गचित्रणाचा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निसर्गात जाऊन निसर्गचित्रण करता यावे व त्यांच्यामध्ये कलेची आवड निर्माण व्हावी म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम शाळेतील सेवानिवृत्त कलाशिक्षक श्री. कैलास यादव सरोदे यांनी त्यांच्या संकल्पनेतून विद्यार्थी, शाळा व संस्थेवर असलेल्या प्रेमापोटी राबविला. श्री. कैलास सरोदे हे सेवानिवृत्तीनंतरही शाळेत विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण व दर्जेदार उपक्रम राबवित आहेत. शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिलीप सलाबत तडवी यांना हा उपक्रम खूपच आवडला म्हणून त्यांनी हा उपक्रम शाळेत यशस्वीपणे राबविला. हा उपक्रम शाळेत इ. आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



कलाशिक्षक श्री. कैलास सरोदे सर,श्री.पांडुरंग भारती सर, बदलापूरच्या गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलच्या कला शिक्षिका सौ. उर्मिला दुरगुडे व शाळेचा माजी विद्यार्थी कु. अक्षय गगे यांनी विद्यार्थ्यांना अगदी सहज सोप्या पद्धतीने निसर्गचित्रणाचे उत्कृष्ट असे प्रात्यक्षिक करून दाखविले. विद्यार्थ्यांना या प्रात्यक्षिकांचा छान उपयोग झाला आणि विद्यार्थ्यांनी अप्रतिम असे निसर्गचित्र तयार केले.

हा निसर्गचित्रणाचा उपक्रम कल्याणातील दुर्गाडी किल्ला परिसर व कल्याण खाडी परिसरात घेण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिलीप सलाबत तडवी सर, पर्यवेक्षक श्री. पंढरीनाथ बाविस्कर व ज्येष्ठ शिक्षक श्री. उत्तम गायकवाड सर यावेळी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक करण्यासाठी निसर्गचित्रणाच्या ठिकाणी आवर्जून उपस्थित होते.

या उपक्रमाला स्पर्धेचे रूप देण्यात आले असून पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या पारितोषिकासाठी सौजन्यही श्री. कैलास सरोदे सर यांचे असणार आहे.

या उपक्रमासाठी मुख्याध्यापक श्री. दिलीप तडवी सर, पर्यवेक्षक श्री. पंढरीनाथ बाविस्कर व ज्येष्ठ शिक्षक श्री. उत्तम गायकवाड सर यांचे विशेष सहकार्य लाभले.

या उपक्रमाचे संस्थेचे पदाधिकारी , विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी भरभरून कौतुक केले.

# भविष्यवेध



बुधवार
०४ फेब्रुवारी २०२६

**मेष**
कार्यस्थळावर तुमचे साहस आणि ऊर्जा दिसून येईल. नवीन प्रकल्प आणि व्यवसायात यश मिळण्याची पूर्ण शक्यता आहे. घर किंवा व्यवसायासाठी वाहन किंवा मालमत्ता खरेदीचे योग आहेत.

**वृषभ**
तुमची मेहनत आणि समर्पण थेट बँक खात्यात दिसेल. नोकरी किंवा व्यवसायात अचानक वाढ होऊ शकते. जुने गुंतवणूक किंवा प्रकल्पांमधून लाभ मिळण्याची शक्यता आहे.

**मिथुन**
प्रतिष्ठा आणि मान-सन्मान वाढेल. कुटुंबात सुख-शांती राहील आणि नातेसंबंधांमध्ये सामंजस्य राहील. रिअल इस्टेट किंवा नवीन मालमत्ता घेण्याचा विचार करत असाल, तर हा काळ अनुकूल आहे.

**कर्क**
योजनांवर लक्ष द्या आणि योग्य वेळी निर्णय घ्या. प्रयत्न आणि मेहनत लवकर फळ देईल. व्यापाऱ्यांसाठी नवीन ग्राहक आणि नवीन करार येऊ शकतात. नोकरी करणाऱ्यांना प्रमोशन किंवा पगारवाढ मिळू शकते.

**सिंह**
तुमच्या मुलांच्या बाबतीत तुम्हाला सकारात्मक परिणाम दिसतील. कौटुंबिक जीवन चांगले राहील. नोकरीत बदली होण्याची शक्यता आहे. आज तुमची आर्थिक परिस्थिती चांगली असेल.

**कन्या**
तुम्ही तुमच्या कुटुंबासह सुंदर ठिकाणी प्रवास करू शकता. तुमच्या जोडीदारासोबत तुमचे नाते चांगले राहील. तुमचे प्रयत्न यशस्वी होतील. अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**तुळ**
कामाच्या ठिकाणी तुमच्या कामामुळे चांगली बढती मिळू शकते. तुम्ही कामात खूप व्यस्त असाल. तुमच्याकडे तुमच्या कुटुंबासाठी कमी वेळ असेल. सहकाऱ्यांसोबत संबंध चांगले असतील.

**वृश्चिक**
आज तुम्ही एक नवीन प्रकल्प सुरू कराल, जो यशस्वी होण्याची शक्यता आहे. आज तुमची आर्थिक परिस्थिती चांगली होईल. आज तुम्हाला एक चांगली बातमी मिळेल तुम्ही दिवसभर हसत राहाल.

**धनु**
कामावर बढतीची तुमची वाट पाहणे संपेल. तुमच्या नवीन पदावर कामाचा ताण वाढेल. विविध स्रोतांकडून आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या मुलांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल.

**मकर**
नोकरीत यश मिळण्याची शक्यता आहे. तुमचा पगार वाढू शकतो. कामाचा ताण वाढू शकतो, ज्यामुळे तुमच्या कुटुंबासोबत वेळ मर्यादित राहील. तथापि, काम आणि घर यांच्यात चांगले संतुलन राखाल.

**कुंभ**
तुमचे कौटुंबिक जीवन आनंदी राहील. परिस्थिती अनुकूल असेल. कामाच्या ठिकाणी विरोधक काही अडचणी निर्माण करतील, परंतु तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित कराल.

**मीन**
तुमची एकाग्रता तुम्हाला यश देईल. नातेवाईकांसोबत एक छोटीशी सहल शक्य आहे आणि तुमचा प्रवास आनंददायी होईल. कौटुंबिक संबंध प्रेमात वाढतील. कामावर पदोन्नतीची शक्यता आहे.

# कोपरीत झाडाला आग



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : कोपरी येथील गांधीनगर परिसरात असलेल्या राम मंदिराजवळ सोमवारी सकाळी सातच्या सुमारास एका जुन्या झाडाला अचानक आग लागल्याची घटना घडली. गांधीनगर भागात एका मोठ्या झाडाला आग लागल्याची माहिती ठाणे पालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाला मिळाली. सुदैवाने, अग्निशमन दलाने वेळीच धाव घेतल्याने ही आग आटोक्यात आली असून, या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झालेली नसल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

# दहावी–बारावीच्या परीक्षाकाळात रस्ते व मेट्रो कामे तात्पुरती थांबवण्याची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २

**कल्याण, डोंबिवलीत एमएमआरडीएकडून सीमेंट काँक्रीटची कामे सुरू आहेत. या कामांचे सामान घेऊन मिक्सर, डम्पर, हायवा, पाण्याचे टँकर शहरात धावत असतात. त्यामुळे शहरात कोंडी होते. ही कामेही परीक्षा कालावधीत काही दिवस थांबवावित. काही शाळांच्या परिसरात काँक्रीट रस्त्यांची कामे सुरू आहेत. तेथे परीक्षा केंद्रावर जाताना कोणताही अडथळा येणार नाही याची काळजी घेण्याची मागणी रिक्षा संघटनेने एमएमआरडीए, वाहतूक उपायुक्त यांच्याकडे केली आहे.**

**कल्याण** : फेब्रुवारी व मार्च महिन्यात सुरू होणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर कल्याण, डोंबिवली तसेच शिळफाटा व कल्याण–मुरबाड रस्ता परिसरातील परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात ये-जा असणार आहे. या काळात विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचता यावे, यासाठी शिळफाटा रस्त्यावरील मेट्रो मार्गाची कामे तसेच शाळा परिसरातील सुरू असलेली सिमेंट काँक्रीट रस्त्यांची कामे काही दिवस तात्पुरती थांबवावीत, अशी मागणी डोंबिवली रिक्षा चालक मालक संघटनेचे कार्याध्यक्ष दत्ता माळेकर व सरचिटणीस किशोर सोरखादे यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या महानगर आयुक्तांकडे केली आहे.

मागील दोन वर्षांपासून कल्याण व डोंबिवली शहरात दिवस-रात्र वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. शिळफाटा रस्त्यावर मेट्रो मार्गाची कामे सुरू असून काटई गावाजवळ निळजे उड्डाण पुलाचे काम रेल्वेकडून सुरू आहे. त्यामुळे हा संपूर्ण परिसर सातत्याने वाहतूक कोंडीने गजबजलेला असतो.

शिळफाटा रस्त्याच्या दुतर्फा मानपाडा, उंबार्ली, काटई व पलावा परिसरात अनेक शाळा असून, डोंबिवली शहरातील विद्यार्थी दहावी व बारावीच्या परीक्षा देण्यासाठी या परीक्षा केंद्रांवर येणार आहेत. तसेच शिळफाटा परिसरातील विद्यार्थीही डोंबिवलीतील शाळांमध्ये परीक्षा देण्यासाठी प्रवास करणार आहेत.

परीक्षांच्या काळात सुरू असलेल्या कामांमुळे वाहतूक कोंडी वाढून विद्यार्थ्यांना वेळेवर परीक्षा केंद्र गाठणे कठीण होऊ शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून संबंधित सर्व विकासकामे परीक्षाकाळात तात्पुरती स्थगित ठेवावीत, अशी ठाम मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# बदलापुरातील अतिक्रमणांवर सलग दुसऱ्या दिवशीही कारवाईचा बडगा !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २

**बदलापूर** : कुळगाव–बदलापूर नगर परिषदेच्या सांडपाणी व्यवस्थापनासंदर्भात सुरू असलेल्या एका खटल्याच्या निमित्ताने बदलापूर शहरातील अतिक्रमणांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नगर परिषदेने दोन महिन्यांपूर्वी जाहीर केलेल्या यादीनुसार शहरात ४३८ अनधिकृत बांधकामे असल्याचे समोर आले असून, अर्धवट राहिलेल्या सर्वेक्षणामुळे आणखी अनेक बांधकामे यादीबाहेर राहिल्याची चर्चा आहे.

मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी पालिका प्रशासनाने या अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरू ठेवली असून, पुढील अनेक दिवस ही मोहीम सुरू राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या काही वर्षांत बदलापूर शहराचा वेगाने विस्तार झाला आहे. मोठ्या प्रमाणावर उभ्या राहिलेल्या रहिवासी संकुलांमुळे दुकाने, गाळे, बाजारपेठा तसेच उपहारगृहे व हॉटेल्सही वाढली. मात्र यातील अनेक बांधकामांसाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आलेल्या नव्हत्या.

दरम्यान, सन २०२० च्या सुरुवातीला करोनाचे संकट गडद होत असतानाच नगर परिषदेतील लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपून प्रशासकीय राजवट सुरू झाली. याच काळात शहरात रस्तोरस्ती व गल्लोगल्ली दुकाने, खाद्यपदार्थ विक्री केंद्रे व इतर व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू झाले. करोनाकाळात माणुसकीच्या भूमिकेतून या



## ४३८ अनधिकृत बांधकामांवर हतोडा

अतिक्रमणांकडे काही काळ दुर्लक्ष करण्यात आले. मात्र परिस्थिती सुरळीत झाल्यानंतरही त्यावर नियंत्रण ठेवले गेले नाही. याच कालावधीत कर्जत राज्य मार्गाचे रुंदीकरण, प्रस्तावित पनवेल महामार्गाच्या कामाला गती तसेच जवाहरलाल नेहरू न्यास ते बडोदे मार्गाचे काम वेगाने सुरू झाल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात रहिवासी संकुले उभी राहिली. बदलापुरात बँकांचे वाढलेले जाळे, हॉटेल्स, चारचाकी-दुचाकी शोरूम, नामांकित ब्रँड्सची दुकाने यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलला. मात्र या विकासासोबतच अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांचा विळखा अधिक घट्ट झाल्याचे आता स्पष्टपणे दिसून येत आहे. पालिका प्रशासनासमोर या अतिक्रमणांवर ठोस व सातत्यपूर्ण कारवाई करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

# सत्तेत असलो; तरी जाब विचारू

## महापौर, उपमहापौर निवडीनंतर संजय केळकरांचं विधान चर्चेत



### सडेतोड जाब विचारणार

**पाच वर्षे भ्रष्टाचारमुक्त विकास राबविण्याचा आमचा प्रयत्न असेल. परंतु कोणी त्यात चुकत असेल तर त्याला जाब विचारल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. अनाधिकृत बांधकामांचा विषय हा सुरुच राहणार आहे. फेरीवाला धोरण का झाले नाही, फेरीवाल्यांची संख्या वाढत आहे, फुटपाथ, रस्ते व्यापलेले आहेत. ते मुक्त करण्यासाठी किंबहुना त्यावर सडतोड जाब विचारला जाणार आहे. पाच वर्षे भ्रष्टाचारमुक्त विकास राबविण्याचा आमचा - प्रयत्न असेल. सत्तेत असलो तरी, कुठे चुकत असेल तर त्याचा जाब विचारल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिकेच्या मंगळवारी झालेल्या विशेष सभेत शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या नगरसेविका शर्मिला पिंपळोलकर यांची महापौर पदावर तर, भाजपचे नगरसेवक कृष्णा पाटील यांची उपमहापौर पदावर बिनविरोध निवड झाली. या निवडीनंतर भाजपचे आमदार संजय केळकर यांनी महापौर पिंपळोलकर आणि पाटील यांची पालिका मुख्यालयात जाऊन भेट घेत त्यांना शुभेच्छा दिल्या. यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी पारदर्शी, भ्रष्टाचारमुक्त आणि योग्य दिशेने विकास झाला पाहिजे, यासाठीही कटीबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

ठाणे महापालिका निवडणुकीत आम्ही ठाणेकरांना आश्वासन दिले होते. निवडणुकीपूर्वी भाजपने ठाणेकरांसाठी जाहीरनामा सादर केला होता. हा जाहीरनामा पूर्ण करण्याचा आता आमचा प्रयत्न असणार आहे. अनाधिकृत बांधकामांचा विषय हा सुरुच राहणार आहे. फेरीवाला धोरण का झाले नाही, फेरीवाल्यांची संख्या वाढत आहे. पदपथ आणि रस्ते व्यापलेले आहेत. ते मुक्त करण्यासाठी किंबहुना त्यावर सडतोड जाब विचारला जाणार आहे, असे केळकर म्हणाले.

**■ वरिष्ठ नेते निर्णय घेतील**

महापौर पद दिले नाहीतर स्वबळावर लढू असा इशारा भाजपने दिला होता. परंतु भाजपने सत्तेत सहभागी होत उपमहापौर पद स्विकारले तसेच इतर कोणती पदे भाजपला मिळणार आहेत, असा प्रश्न पत्रकारांनी केळकर यांना विचारला असता, सत्तेत सहभागी होत आम्ही उपमहापौर पद घेतले आहे. परंतु इतर समिती बाबतचा निर्णय हा वरीष्ठ पातळीवर होणार असल्याचे केळकर यांनी यावेळी स्पष्ट केले. येत्या काही दिवसात यावर सविस्तर चर्चा केली जाईल. जे काही वाटप होईल ते सन्मानपूर्वक झाले पाहिजे अशी आमची अपेक्षा असल्याचे ते म्हणाले.



# वसई विरार महापालिकेच्या महापौर पदी अजीव पाटील तर उपमहापौर पदी मार्शल लोपीस

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. ३

**वसई** : मंगळवारी वसई-विरार महापालिकेत महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत महापौर पदी बहुजन विकास आघाडीचे अजीव पाटील तर उपमहापौर पदी मार्शल लोपीस यांची निवड झाली आहे. अजीव पाटील हे विरार महापालिकेचे सातवे महापौर तर मार्शल लोपीस हे पाचवे उपमहापौर ठरले आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत बविआने आपल्या विजयाने महापालिकेत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. ११५ जागांपैकी बविआकडे ७० जागा, काँग्रेसला १, भाजपाला ४३ आणि शिवसेना (शिंदे गट) ला १ जागा मिळाली. या बहुमतीमुळे महापालिकेत बविआकडे सत्तेवर नियंत्रण आहे.

सुरुवातीला बविआकडे स्पष्ट बहुमत असल्याने महापौर निवड बिनविरोध होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, निवडणूक अधिक स्पर्धात्मक बनवण्यासाठी बविआसह भाजपनेही महापौर आणि उपमहापौर पदासाठी अर्ज सादर केला होता. परिणामी निवडणूक प्रक्रियेत उत्सुकता निर्माण झाली आणि महापौर व उपमहापौर निवडीच्या निर्णयाची औपचारिक घोषणा झाली.

# यंदा फ्लेमिंगोंची नवी मुंबईला नापसंती?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● नवी मुंबई : / दि. ३**

ठाणे खाडी, नवी मुंबई आणि आसपासच्या पाणथळ भागात दरवर्षी जानेवारी महिन्यात मोठ्या संख्येने दाखल होणारे फ्लेमिंगो यंदा अपेक्षेप्रमाणे दिसून आलेले नाहीत. हिवाळ्याचा अर्धा टप्पा उलटूनही गुलाबी थव्यांचे आगमन न झाल्याने पक्षीप्रेमी, निसर्ग अभ्यासक आणि छायाचित्रकारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. साधारणपणे डिसेंबरच्या अखेरीस आणि जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यात ठाणे खाडी, तुर्भे परिसर तसेच नवी मुंबईतील पाणथळ भाग गुलाबी रंगात न्हाऊन निघतात. मात्र यंदा काही ठिकाणी मोजकेच फ्लेमिंगो दिसून येत असून बहुतेक ठिकाणी त्यांची संख्या अत्यल्प असल्याचे निरीक्षण नोंदवले जात आहे.



# केडीएमसी महासभेत गदारोळ

## अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसेंना शिवसेना नगरसेवकांनी झापले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २

**कल्याण** : कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीनंतर पार पडलेली पहिली महासभा चांगलीच गाजली. या महासभेत शिवसेना नगरसेवक मल्लेश शेट्टी यांनी आक्रमक भूमिका घेत केडीएमसीच्या अधिकाऱ्यांवर जोरदार टीका केली. यावेळी त्यांनी अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांना जाहीरपणे झापल्याने सभागृहात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

महासभेदरम्यान नगरसेवक मल्लेश शेट्टी यांनी अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. “या महासभेत तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही. बोलू नका, अन्यथा बाहेर पडा,” असा थेट दम त्यांनी अधिकाऱ्यांना दिला. तसेच “अधिकाऱ्यांना खूप माज आला आहे,” अशी तीव्र टीकाही त्यांनी केली.

महापौर निवडीनंतर सुरू असलेल्या भाषणांच्या दरम्यान अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे आणि नगरसेवक मल्लेश शेट्टी यांच्यात शाब्दिक वाद झाला. या वादामुळे काही काळ सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पहिल्याच महासभेत घडलेल्या या घटनेमुळे पालिकेतील सत्ताधारी आणि प्रशासनातील तणाव पुन्हा एकदा उघड झाला आहे.

महासभेत झालेल्या या प्रकाराची चर्चा पालिका वर्तुळात रंगली असून, पुढील काळात प्रशासन आणि नगरसेवकांमधील समन्वय कसा राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उल्हासनगर महापालिकेवर कलानींचेच वर्चस्व

पान १ वरून ▶▶▶

यंदा शिवसेनेच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले कलानींचे शिलेदार विजयी झाले. त्यातीलच कलानी महलातील एक विश्वासार्ह आणि सुरेश उर्फ पप्पू कलानी तसेच ओमी कलानी यांचे अत्यंत जवळचे मानले जाणारे कमलेश निकम यांच्या पत्नी अश्विनी निकम यांच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडली. निकम या पहिल्यांदाच नगरसेवक म्हणून निवडून आल्या असून भाजपच्या उमेदवारांना पराभूत करत त्यांनी विजय मिळवला होता. त्यांच्या जोडीला भाजपचे अमर लुंड उपमहापौर म्हणून निवडून आले आहेत. उल्हासनगर महापालिकेत या दोन्ही पदांसाठी एकच अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली. या सत्तेला महायुतीचे नाव दिले जात असले तरी एकमेकांचे अस्तित्व संपवण्याची भाषा करणारे कलानी समर्थक आणि भाजप आता एकत्रितपणे शहराचा गाडा हाकणार आहेत.

उल्हासनगर महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी कलानी समर्थकांनी



शिवसेनेसोबत 'दोस्ती का गठबंधन' जाहीर करत आपली स्वतंत्र युती जाहीर केली होती. यावेळी कलानी गटाने भाजपसोबत जाणार नाही असे जाहीरच करून टाकले होते. त्यामुळे शिवसेनेने उल्हासनगरात भाजपसोबत युती टाळल्याचे बोलले जात होते. त्यातच प्रचारात भाजपचे प्रचारप्रमुख आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कलानींना उद्देशून अप्रत्यक्षपणे शहरातील गुंडगिरी संपवण्यासाठी भाजपला निवडून द्या, असे आवाहन उल्हासनगरवासियांना केले होते. त्याचवेळी यंदाच्या निवडणुकीत भाजपचा पराभव करू असे कलानी गटाचे प्रमुख ओमी कलानी यांनी अनेकदा म्हटले होते. मात्र सत्तेच्या सारीपाटावर अखेर कलानी आणि भाजपला शिवसेनेसोबत एकत्र सत्ता स्थापन करण्याची वेळ आली. त्यामुळे एकमेकांना संपवण्याची भाषा करणारे कट्टर विरोधक आता पालिकेचा कारभार चालवणार आहेत.

राज्यभरात राबवलेल्या महायुतीचा प्रयोगाचा अंक उल्हासनगरातही पहायला मिळाला. एकमेकांविरूद्ध लढूनही शिवसेना आणि भाजप एकत्र आले. महापौरपद शिवसेनेच्या तिकिटावर जिंकलेल्या कलानी गटाच्या अश्विनी निकम यांना तर उपमहापौर पद भाजपच्या अमर कुंड यांना मिळाले. मंगळवारी दोघांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी रत्नागिरीचे जिल्हाधिकारी मनुज जिंदल निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपस्थित होते. या युतीमुळे उल्हासनगरात सक्षम विरोधी पक्षच उरलेला नाही. एकूण ७८ नगरसेवकांपैकी ७७नगरसेवक हे सत्तेत सहभागी झाले आहेत.

# कल्याण–डोंबिवली : भटक्या श्वानांसाठी अँटी रेबीज लसीकरण मोहिम यशस्वी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २

**कल्याण : कल्याण–डोंबिवली महानगरपालिका (KDMC) व WVS Hope Foundation यांच्या सामजस्य करारानुसार Mission Rabies Drive अंतर्गत पलावा सिटी, डोंबिवली येथे भटक्या श्वानांसाठी अँटी रेबीज लसीकरण मोहीम २५ ते २७ जानेवारी २०२६ दरम्यान यशस्वीपणे पार पडली. या मोहिमेत एकूण ४२१ प्राणी लसीकरणासाठी समाविष्ट झाले, ज्यात ३९९ कुत्रे आणि ३० मांजरे आहेत.**



केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार २०३० पर्यंत रेबीज निर्मूलनासाठी भटक्या श्वानांना नियमित लसीकरण करणे अत्यावश्यक आहे. KDMC, WVS Hope Foundation आणि PAWS (Plant & Animals Welfare Society) यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे शहरात रेबीज निर्मूलनाच्या दिशेने मोठा टप्पा पार पडला आहे.

महानगरपालिकेच्या प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या मोहिमेमुळे नागरिकांमध्ये प्राणी आरोग्याबाबत जनजागृतीही वाढीस लागली आहे. पुढील काळात WVS Hope Foundation च्या माध्यमातून KDMC क्षेत्रातील भटक्या प्राण्यांसाठी नियमित अँटी रेबीज लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. अशी माहिती माहापालिकेच्या. वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# ठाणे : शास्त्रीनगर भागातील १८ मजली इमारतीत आग; २ जखमी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. ३

**ठाणे** : ठाणे शहरातील शास्त्रीनगर भागात असलेल्या मिलन हिल इमारतीत मंगळवारी पहाटे आग लागल्याची घटना उघडकीस आली आहे. १८ मजली इमारतीच्या १० व्या मजल्यावरील इलेक्ट्रिक डक्टमध्ये आग लागल्यामुळे इमारतीत आणि परिसरात भितीचे वातावरण पसरले.

घटनेत ६० ते ७० रहिवाशी अडकले होते. १० व्या मजल्यावरील रूम नंबर १००५ मध्ये चार तर १००६ मध्ये तीन रहिवाशी अडकले होते. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाने त्यांना बाहेर काढले. या



घटनेत रुचिरा देशमुख (७४) यांचे दोन्ही हात आणि विवेक प्रधान (६४) यांचे हात व पाय भाजले असून त्यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले गेले.

आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, उपस्थानक अग्निशमन दल, महावितरण कर्मचारी आणि महानगर गॅस कंपनीचे कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होऊन आग विझविली. आग ५:३० वाजताच्या सुमारास पूर्णपणे नियंत्रणात आणली गेली. १० ते १३ मजल्यावरील इलेक्ट्रिक डक्ट तसेच १० व्या मजल्यावरील दोन सदनिकांचे दरवाजे जळून नष्ट झाले आहेत, मात्र आग मोठ्या प्रमाणात पसरण्यापासून रोखली गेली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

ठाणे ■ बुधवार
०४ फेब्रुवारी २०२६
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




# अर्थसंकल्प 'विकसित भारत' - कामगारांच्या प्रगतीवर भर - आकाश फुंडकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : प्रतिनिधी / दि. ३** कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी नेतृत्वाखाली अर्थसंकल्प गरीब, शेतकरी व कामगारांचे जीवनमान उंचावणारा आहे. राज्यातील पायाभूत सोयीसुविधा, सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी १० हजार कोटींची तरतूद, वस्त्रोद्योग क्लस्टर आणि खनिज कॉरिडॉरमुळे रोजगाराच्या संधी वाढतील.

सरकारने कॅन्सर व मधुमेहाची औषधे स्वस्त करण्याचे, बायोफार्मा उत्पादनासाठी १० हजार कोटींची तरतूद करण्याचे निर्णय घेतले आहेत. खादी व हातमाग क्षेत्रासाठी 'महात्मा गांधी ग्रामस्वराज' अभियान राबविले जाईल, ज्यामुळे ग्रामीण कारागिरांचे उत्पन्न वाढेल. कृषी उत्पादन व खनिज कॉरिडॉरमुळे भारताच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल.

मंत्री फुंडकर म्हणाले की, सातत्याने आर्थिक विकास दरात वाढ करणे सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे, आणि अर्थसंकल्प सामान्य नागरिकांसाठी प्रत्यक्ष फायद्याचा ठरणार आहे.




# कल्याणात शरीरसौष्ठव स्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** हिंदुस्तानातील तमाम हिंदुप्रेमी नागरिकांचे आराध्य दैवत असणारे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे यंदा जन्मशताब्दी वर्ष असून यानिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांच्या नेतृत्वाखाली उद्धव बाळासाहेब ठाकरे कल्याण शहर शिवसेना शाखेने शरीर सौष्ठव स्पर्धेचे भव्यदिव्य आयोजन केले आहे. या स्पर्धेत कोण होणार 'हिंदुहृदयसम्राट श्री २०२६' चा मानकरी हे पाहणे मात्र उत्सुकतेचे ठरणार आहे.

शिवसेना उपनेते विजय साळवी व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कल्याण शहर शाखा यांच्या वतीने "हिंदुहृदयसम्राट श्री २०२६' ही शरीरसौष्ठव स्पर्धा शुक्रवार दिनांक ०६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता कल्याणमधील यशवंतराव चव्हाण क्रीडांगण (मॅक्सी ग्राउंड) संतोषी माता मंदिर रोड, कल्याण पश्चिम येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेस ठाणे जिल्हा बॉडी बिल्डर्स असोसिएशनची मान्यता आहे. या स्पर्धेला कल्याणकर क्रीडाप्रेमींनी व खेळाडूंनी तसेच निष्ठावंत शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व ही स्पर्धा यशस्वी करावी असे आवाहन शिवसेना उपनेते अल्ताफ शेख, कल्याण पश्चिम व मुरबाड जिल्हाप्रमुख अल्पेश भोईर, कल्याण पश्चिम शहरप्रमुख बाळा परब, कल्याण पश्चिम विधानसभा संघटक किशोर शुक्ला आदींनी केले आहे.

# भिवंडीकरांना अतिरिक्त १०० एमएलडी पाण्याचा दिलासा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहरात नव्याने होणारी बांधकाम व उभ्या राहणाऱ्या इमारती,अनधिकृत इमारती आणि झोपडपट्टी त्यामधून वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि अनियोजित होणारे शहरीकरण या सारख्या मूलभूत समस्यांनी गेल्या काही वर्षांपासून भिवंडी त्रस्त झाली आहे.वाढत्या लोकसंख्येसाठी सर्वात गंभीर समस्या म्हणजे पिण्याचे पाणी असून सध्या शहरातील नागरिकांना पिण्याचे मुबलक व स्वच्छ पाणी मिळत नाही. दरम्यान केंद्र सरकारने अमृत योजना २.० अंतर्गत भिवंडीसाठी एक महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर केला आहे,जो येत्या काळात शहराला अतिरिक्त १०० एमएलडी पाणी पुरविणार असून त्या अंतर्गत दोन जलशुद्धीकरण प्रकल्प उभारले जाणार आहे. सन २०५४ पर्यंत भिवंडीकरांची तहान भागवण्याचे लक्ष ठेऊन हा प्रकल्प उभा राहत असून त्याचे काम सुरु झाले असल्याची माहिती पालिका सुत्रांनी दिली.

भिवंडीसाठी शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी, केंद्र सरकारने ₹४२६ कोटी खर्चाच्या या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाचे काम १७ जानेवारी २०२४ रोजी सुरु करण्यात आले आहे. महापालिकेच्या सूत्रांनुसार, या प्रकल्पाचा सुमारे ७० टक्के भाग महापालिकेच्या जमिनीवर सुरू आहे. कायदेशीर काही प्रक्रिये नंतर कामाला वेग येऊन हा प्रकल्प 2 वर्षात पूर्ण होईल असे मत व्यक्त करण्यात येत आहे. प्रत्येक भागात पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी, शहराच्या विविध भागात २४ पाण्याच्या टाक्या बांधल्या जातील.




पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप पटनवार यांनी सांगितले की, या प्रकल्पांतर्गत शहरात मोठ्या आणि लहान अशा २४ पाण्याच्या टाक्या बांधल्या जातील. अशोक नगर, एसटी स्टँड आणि नारपोली येथील ७२ गाला जवळील दोन पाण्याच्या टाक्या तसेच नारळी तलाव आणि वरळा मंदिराजवळील नवीन पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू झाले आहे. या टाक्यांची क्षमता १.२ दशलक्ष लिटर ते २० दशलक्ष लिटर पर्यंत असेल, ज्यामुळे प्रत्येक क्षेत्रासाठी पुरेसा पाण्याचा दाब सुनिश्चित होईल.

## प्रकल्पांतर्गत शहरातील विविध भागांत एकूण २४ पाण्याच्या टाक्या उभारल्या जाणार

अमृत योजना २.० अंतर्गत भिवंडी शहरासाठी राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पातून शहराला अतिरिक्त १०० एमएलडी पाणी मिळणार आहे. या प्रकल्पांतर्गत शहरातील विविध भागांत एकूण २४ पाण्याच्या टाक्या उभारल्या जाणार असून, त्यामध्ये ७२ गाला, वसई रोड, साठे नगर, नारली तलाव, समद नगर, मौलाना आझाद गार्डन, एसटी डेपो, नागाव, शांती नगर, नवी बस्ती, नेहरू नगर, सोनाळे, आझाद नगर, गायत्री नगर, अशोक नगर आणि वराळा मंदिर परिसर यांचा समावेश आहे. तसेच सुरक्षित ठिकाणी आणखी ४ टाक्या बांधण्यात येणार आहेत.

पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप पटनवार यांच्या माहितीनुसार, सुमारे ▫३५० कोटी किमतीच्या बांधकामाचा या प्रकल्पात समावेश असून आतापर्यंत सुमारे १० टक्के काम पूर्ण झाले आहे. बीएमसीच्या जमिनीवरील एनओसी आणि कायदेशीर अडचणींमुळे कामास काहीसा विलंब झाला असला तरी अडथळे दूर झाल्यानंतर कामाला गती मिळेल, असे सांगण्यात आले.

या प्रकल्पांतर्गत पिसे धरणापासून भिवंडी शहरापर्यंत सुमारे १५ किमी लांबीची १३२१ मिमी व्यासाची मुख्य पाईपलाईन टाकली जाणार असून, शहरात ३९ किमी लांबीचे वितरण जाळे उभारले जाणार आहे. यासोबत पूल, पंप हाऊस, सबस्टेशन, जॅकवेल आणि ओव्हरहेड पंप हाऊसची कामेही करण्यात येणार आहेत.

नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे यासाठी सोनाळे येथे १२३ एमएलडी आणि टेमघर येथे ५३ एमएलडी क्षमतेची दोन जलशुद्धीकरण संयंत्रे उभारली जाणार आहेत. संपूर्ण शहर तीन पाणीपुरवठा झोनमध्ये विभागले जाणार असून, स्टेम, मुंबई महानगरपालिका आणि भातसा येथून पाणीपुरवठा केला जाणार आहे.

हा ▫४२६ कोटींचा महाप्रकल्प केंद्र, राज्य आणि भिवंडी महापालिकेच्या संयुक्त सहभागातून राबविला जात असून, २०५४ पर्यंतची पाण्याची गरज लक्षात घेऊन नियोजन करण्यात आले आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर भिवंडीची पाणीटंचाई दूर होईल, असा विश्वास महापालिकेने व्यक्त केला आहे.

# लांबाच्या वाडीच्या विकासाचा आदर्श राज्यभर घ्यावा - विवेकभाऊ पंडित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड नगरपंचायत क्षेत्रातील लांबाची वाडी एक आदर्शव्रत आदिवासी वस्ती म्हणून विकसित झाली असून इथे केलेल्या विकास कामांचा आदर्श संपुर्ण राज्याने घ्यावा व आदिवासी बांधवाचा विकास करावा असे गौरवोद्गार श्रमजीवी संघटनेचे अध्यक्ष विवेकभाऊ पंडित यांनी मुरबाड लांबाचीवाडी येथे काढले.

रविवारी १ फेब्रुवारीला विवेकभाऊ पंडित यांचा मुरबाड दौरा होता. शिरवली येथिल कार्यक्रमा नंतर विवेकभाऊ पंडित यांनी मुरबाड नगर पंचायत क्षेत्रातील प्रभाग क्रमांक २ मधे येत असलेल्या लांबाचीवाडी या आदिवासी वस्तीला भेट दिली. स्थानिक नगरसेविका मानसी मनोज देसले व जनसेवक मनोज देसले यांनी अल्पावधीतच या आदिवासी वाडीचा केलेला कायापालट पाहून विवेक पंडित भारावून गेले. येथिल कांक्रिटचे रस्ते, समाजमंदिर, व्यायामशाळा, हनुमंतरायाचे मंदिर, अंगणवाडी, शाळा, स्मशानभूमी, पाणी पुरवठा,आदिवासी महिलांना रोजगार तसेच संपुर्ण रस्त्यावर केलेली आकर्षक रंग सजावट बघितल्यावर मन भरून येते असा विकास झाला तर बुलेटट्रेन व समृद्धीमहामार्गाची गरज नाही. मी इथे काही सांगायला किंवा शिकवायला आलो नसून येथून शिकायला आलो आहे असे म्हणत मनोज देसले व मानसी देसले या दांम्पत्याचे मनापासून कौतुक केले.



अशा प्रकारचा विकास केला तर हे राज्य व देश नक्कीच सुजलाम सुफलाम होईल आणि खऱ्या अर्थाने आपण स्वातंत्र्य झालो आहोत असे समजू. येथील विकास कामांसाठी स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी भरीव निधी उपलब्ध करून सहकार्य केल्या बद्दल त्यांचे देखील आभार मानत त्यांच्या राजकीय अनुभवाचा फायदा संपुर्ण राज्याला होवो असा आशावाद यावेळी त्यांनी व्यक्त केला.

या भेटी दरम्यान त्यांच्यासमवेत तहसीलदार अभिजित देशमुख, मुरबाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक दादासो एडके, गटविकास अधिकारी डॉ. लता गायकवाड, मा. नगराध्यक्ष मोहन सासे, नितीन सुर्यवंशी, गणेश खंडागळे,यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक आदिवासी बंधूभगिनी उपस्थित राहून विवेकभाऊ पंडित यांचे स्वागत केले.

# एनपीएस कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरणाचा मार्ग मोकळा करण्याची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (एनपीएस) लागू असलेल्या शासकीय व अनुदानित शालेय कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती, राजीनामा, नोकरी सोडणे किंवा निधन झाल्यास अर्जित रजेचे रोखीकरण मंजूर करण्यात यावे, अशी मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी महाराष्ट्र शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त विभाग) ओम प्रकाश गुप्ता (भा.प्र.से.) तसेच प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) रणजीत सिंह देओल (भा.प्र.से.) यांना निवेदनाद्वारे केली आहे.

दि. ३१ ऑक्टोबर २००५ च्या शासन निर्णयानुसार १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम, १९८२ तसेच सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू नाही. मात्र या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ लागू होत नाहीत, असे कोणतेही आदेश शासनाकडून निर्गमित झालेले नाहीत. वित्त विभागाच्या अवर सचिव मा. अनिता लाड यांनी १४ जून २०२३ रोजी दिलेल्या पत्रानुसार, १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ जसेच्या तसे लागू असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे एनपीएस अंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांनाही अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देणे कायदेशीरदृष्ट्या शक्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

तथापी शालेय शिक्षण विभागाकडे याबाबत स्पष्ट निर्देश नसल्यामुळे अनेक सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्रकरणे प्रलंबित आहेत. यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर वित्त विभागाने दिलेल्या सूचनांप्रमाणेच स्पष्ट आदेश शालेय शिक्षण विभागास देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली असून यामुळे प्रलंबित प्रकरणे मार्गी लागून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# ठाण्यात 'माझा भारत, माझे मत' संकल्पनेतून राष्ट्रीय मतदार दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** रविवार २५ जानेवारी २०२६ रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा झाला. मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी तसेच लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी ठाणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने १६ वा राष्ट्रीय मतदार दिन अत्यंत उत्साहात संपन्न झाला. माझा भारत, माझे मत, मी भारत आहे या संकल्पनेवर हा कार्यक्रम आयोजित केला होता. जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले. या कार्यक्रमाला ठाणे सिटीझन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅस्बर ऑगस्टीन यांच्यासह



जिल्हाधिकारी कार्यालय अधिकारी, तहसीलदार कार्यालयातील अधिकारी तसेच निवडणूक शाखेतील इतर अधिकारी, कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला क्रांतीज्योती विद्यालय चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक हेमंत ढोमे, अभिनेत्री व निर्माती क्षिती जोग, अभिनेता अमेय वाघ, हरीश दुधाडे यांची विशेष उपस्थिती होती. त्याचबरोबर ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक अरुण करमरकर यांनी लोकशाहीतील मतदानाचे महत्व आणि महिलांच्या सहभागावर आपले विचार मांडले. लोकशाहीत मतदानाचे महत्व पटवण्यासाठी उत्कृष्ट घोषवाक्य स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये ठाण्याच्या श्रीरंग विद्यालयाच्या निवृत्त शिक्षिका लीना बल्लाळ यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन चित्रपट अभिनेता अमेय वाघ यांच्या हस्ते गौरविण्यात आले. आयुष्याच्या उत्तरार्धात मिळणारे सन्मान हे खरोखरच उर्वरित आयुष्याला ऊर्जा देणारे वरदान ठरतात.

# भिवंडीतील शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील विविध शाळांमध्ये एका संस्थेच्या वतीने आयोजित व्यवसाय, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तीमत्व विकास शिबीराला विद्यार्थी, शिक्षकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सह्याद्री प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष विश्वास थळे यांच्या संकल्पनेतून भिवंडी तालुक्यातील चार विद्यालयामध्ये




व्यवसाय, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन,व्यक्तीमत्व विकास, शिबीर कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षण हीच उज्वल भविष्याची शिडी असल्याने व्यक्तीमत्व विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन हे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवून अचूक अभ्यासक्रम आणि परीक्षेच्या पॅटर्ननुसार नियोजनबद्ध तयारी करण्यास मदत करते. तसेच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून वेळेचे व्यवस्थापन, महत्त्वाच्या विषयांची सखोल माहिती आणि परीक्षेत यश मिळवण्याचे तंत्र विकसित होते. ज्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.सदर उपक्रमात शिक्षणप्रेमी भास्कर भोईर, विलास राऊत यांनी "व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा" या विषयांवर तर रंजना मुकादम व प्रमोद पाटील यांनी "व्यक्तीमत्व विकास "या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. या उपक्रमात बि. ए. राऊत विद्यालय, पाच्छापूर, दादासाहेब दांडेकर विद्यालय,भिवंडी, शां. ना.लाहोटी विद्यालय,अनगाव व अंजूर हायस्कूल,अंजूर या चार नामांकित शाळांतील सुमारे ५०० विद्यार्थी तसेच २५ पेक्षा जास्त शिक्षक,मुख्याध्यापक व संस्थाचालक सहभागी झाले होते.यावेळी सहभागी झालेल्या शाळांना संस्थेच्या वतीने स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट देण्यात आली. सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शाळांचे संचालक व मुख्याध्यापकांच्या समन्वय व सहकार्यातून संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रमोद पाटील सचिव विलास राऊत, सदस्य भास्कर भोईर, रंजना मुकादम, दिपक लेले यांनी मेहनत घेतली.

# कृषी विभागाच्या सहकार्याने आदिवासी शेतकऱ्यांना तुरीचा आधार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : जिद्द व कठोर परिश्रम करण्याची तयारी असल्यानंतर काय बदल घडू शकतो हे आपल्या कृतीतून दाखवले आहे, कल्याण तालुक्यातील गोवेली ठाकूरपाडा येथील आदिवासी शेतकरी गणपत लुखा हिंदोळे याने, कल्याण पंचायत समितीच्या कृषी विभागाच्या सहकार्याने आणि पत्रकार संजय कांबळे यांच्या प्रयत्नातून ९०टक्के अनुदानावर तूर बियाणे दिले होते, पण आज हिच तूर याच्या कुंटूबांचा आधार बनली आहे. तालुक्यातील गोवेली ठाकूरपाडा येथील गणपत लुखा हिंदोळे हे शेतीनिष्ठ शेतकरी आहेत,१०/१२माणसांचे कुंटूब हे शेतीवर अवलंबून आहे. जिल्हा परिषद ठाणे कृषी विभाग कल्याण पंचायत समिती यांच्या



माध्यमातून ९०टक्के अनुदानातून तूर बियाणे वाटप करण्यात आले होते.दुर्दैवाने शेतकऱ्यांला पंचायत समिती कल्याण येथे येता आले नसल्यामुळे पत्रकार संजय कांबळे यांनी हे तूर बियाणे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिले, शेतकऱ्यांने लागवड केल्यानंतर कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे, एस एस संत, व पत्रकार श्री कांबळे यांनी या शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पाहणी करून मार्गदर्शन केले, याचा परिणाम तूर पिक अगदी जोमात आले ,पिक फुलावर असताना विविध औषध फवारणी केली, सध्या रोपे तूरीच्या शेंगाणी वाकलेली आहे, एक दिवसा आड शेंगा खोडून शेजारच्या गोवेली, रायते, मामणोली, टिटवाळा, इत्यादी आठवडे बाजारात विकल्या जातात,१००ते१२५रुपये किलो इतका दर त्यांना मिळत आहे, यामुळे त्यांच्या कुंटूबांला तूरीचा मोठा आधार ठरत आहे, यामुळे घरखर्च व मुलांच्या शाळेचा खर्च भागत असल्याचे शेतकरी श्री हिंदोळे यांनी सांगितले, शिवाय कृषी विभागाचे व पत्रकार कांबळे यांचे त्यांनी आभार ही मानले.

# डोंबिवली पश्चिमेतील कमी दाबाचा पाणीपुरवठा नियमित करण्याची प्रकाश भोईर यांची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण** : डोंबिवली पश्चिमेतील काही प्रभागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून याकडे भारतीय जनता पार्टीने लक्ष वेधले आहे. माजी नगरसेवक तथा भाजपाचे प्रकाश भोईर यांनी केडीएमसी आयुक्तांना पत्र देऊन जास्त दाबाने आणि नियमित पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे. डोंबीवली पश्चिमेतील प्रभाग क्र 22 सहयाद्री नगर, राजूनगर, सरोवर नगर, गरिबाचा वाडा, साई नगर, शंकेश्वर नगर तसेच महालक्ष्मी चौक, या परिसरामध्ये बऱ्याच प्रमाणावर पाणी पुरवठा कमी दाबाने येत असून काही ठिकाणी दिवसातून एका तासापेक्षा कमी पाण्याचा वेळ मिळत असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाई आहे. तसेच केडीएमसीचा टैंकर पुरवठा वेळेवर व पुरेसा होत नसल्याने दोन-अडीच हजार रु. देऊन खाजगी टैंकर आणावे लागतात. काही ठिकाणी दुपारच्या वेळेत पाणी असल्याने गृहिनींना घरची काम आटपून मुलांना शाळेत सोडणे तसेच बाकीच्या दैनंदीन कामातून वेळ काढणे कठीण होते.

शासनाच्या माध्यमातून अमृत योजनेतून राजू नगर व गरिबाचा वाडा या ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधण्याचे काम अत्यंतप्रकाश धिम्या गतिने सुरू असल्याने भविष्यात हे काम कधी होईल हे सांगता येत नाही. तसेच हे झाले तरी डोबिंवली पश्चिमेला ह्या टाक्या भरण्यासाठी माझ्या माहिती प्रमाणे तशी वितरण व्यवस्थेला डोंबिवली पश्चिमेला अधिकची व्यवस्था करण्यासाठी जल वाहिन्यांची वितरण व्यवस्था दिसून येत नाही. तरी या परिसरातील पाणी पुरवठा व्यवस्थित होई पर्यंत नागरिकांना त्यांच्या मागणी नुसार पिण्याच्या पाण्याचे टँकर जास्त वाढवून नियमित व महापालिकेच्या दरात देण्याची व्यवस्था करावी शक्य असल्यास मोफत देण्याची मागणी भोईर यांनी केली आहे.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024